महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांक : बैठक-१८२०/प्र.क्र. ९९/प्रनिप्रा/ ३५५    दिनांक : - 8 FEB 2022

## बैठकीचे इतिवृत्त

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार, **दिनांक ३१ जानेवारी, २०२२ रोजी दुपारी १२:०० वा.** झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक ४२ व्या बैठकीचे इतिवृत्त,-

सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते,-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | डॉ. धनराज माने,<br>संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. | .... | सदस्य |
| २) | डॉ. प्रमोद नाईक,<br>प्र. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा | .... | सदस्य |

प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तथा संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, ३) श्री. विश्वजीत व. माने (भा.प्र.से.) सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषिविषयक शिक्षण व संशोधन परिषद, पुणे व ३), डॉ. के.डी. चव्हाण, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक काही कारणास्तव बैठकीस गैरहजर असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

तसेच श्री. रविंद्र जगताप (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य निवडणुक आयोगाच्या कामकाजानिमित्त बाहेरगावी असल्या कारणाने डॉ. एस.के. महाजन, अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण हे बैठकीस उपस्थित होते.

डॉ. विवेक पाखमोडे, सह-संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई व श्री. सिध्देश नर, परिक्षा समन्वयक, वैद्यकीय / आयुष विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई हे विशेष बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकींचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

विषय क्रमांक १: प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/१२/२०२१ रोजी झालेल्या बैठकींचे इतिवृत्त.

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/१२/२०२१ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त मान्य करण्यात आले.

विषय क्रमांक २: मागील झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार कार्यवाही अहवाल (Action Taken Report) बैठकीपुढे ठेवणे.

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/१२/२०२१ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार घेण्यात आलेल्या निर्णयांस अनुसरुन प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी खालील प्रमाणे सादर केला,-

| अ. क्र. | विषय क्रमांक | बैठकीतील विषय सूची व निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| १. | २(१) | माहे मे २०२१ ते ऑगस्ट २०२१ या कालावधीमध्ये प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या झालेल्या बैठकींचे इतिवृत्त प्राधिकरणाच्या संकेतस्थळाद्वारे सर्व संबंधितांना उपलब्ध करण्यात आलेले आहे.<br><br>तसेच शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील विविध व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाच्या मान्यते नुसार प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेची अभ्यासक्रम व महाविद्यालय -निहाय पत्रे संबंधित महाविद्यालयांना ईमेलद्वारे अवगत करण्यात आलेली आहेत. (सविस्तर अहवाल सोबत जोडला आहे). तसेच मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार संबंधित महाविद्यालयांना प्रवेश मान्यता पत्रे स्पीड-पोस्टद्वारे पाठविण्यात येत आहे. | आयुष विभागाअंतर्गत अभ्यासक्रमांच्या १७६ महाविद्यालयांना प्रवेश मान्यतेची पत्र स्पीड-पोस्ट द्वारे निर्गमित करण्यात आलेली आहेत. उर्वरित अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांच्या प्रवेश मान्यतेची पत्रे पाठविण्याची प्रक्रिया ०८ दिवसांत पूर्ण करण्यात येईल. |
| २. | २(२) | प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील गट-क व गट-ड संवर्गातील कंत्राटी स्वरूपातील कार्यरत कर्मचाऱ्यांचा सेवा पुढील तीन महिने (३१/०३/२०२२ पर्यंत) मुदतवाढ करण्याचे प्राधिकरणाने निर्देश दिले आहेत.<br>तसेच सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष प्राधिकरण व सीईटी कक्ष या दोन्ही | त्यानुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील गट-क व गट-ड संवर्गातील कंत्राटी स्वरूपातील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या सेवा पुढील तीन महिने (३१/०३/२०२२ पर्यंत) मुदतवाढ देण्यात आलेली आहे.<br><br>दोन्ही विभागातील गट क व गट ड संवर्गातील निव्वळ कंत्राटी स्वरुपातील कार्यरत कर्मचाऱ्यांची वैयक्तिक नस्ती |



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय क्रमांक | बैठकीतील विषय सूची व निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| | | विभागातील गट क व गट ड संवर्गातील निव्वळ कंत्राटी स्वरुपातील कार्यरत कर्मचाऱ्यांची वैयक्तिक नस्ती तपासून स्वयंस्पष्ट अहवाल प्राधिकरणापुढे यथावकाश सादर करण्याचे निर्देश दिले. तद्नंतर प्रवेश नियामक प्राधिकरणाने भोसले कमिटीचा अहवाल अंशत: मान्य केल्यानुसार सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या संदर्भात निर्णय घेण्यात यावा. | तपासून स्वयंस्पष्ट अहवाल प्राधिकरणापुढे पुढील १५ दिवसांत सादर करण्यात येईल. *तथापि, प्रस्तुत प्रकरणी भोसले समितीच्या अहवालानुसार करण्यात आलेल्या शिफारशी नुसार वैयक्तिक कर्मचाऱ्यांच्या नस्ती तपासून त्याचा अहवाल प्राधिकरणाच्या आगामी बैठकीपूर्वी सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.* |
| ३. | २(३) | तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या अहवालानुसार ज्या महाविद्यालयामध्ये प्रवेश झालेले नाही अथवा ज्या महाविद्यालयांनी प्रवेश मान्यतेचा प्रस्ताव तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांना अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार विहित कालावधीमध्ये सादर केलेला नाही, अशा महाविद्यालयांकडून संचालनालयाने खुलासा प्राप्त करुन त्याचा स्वतंत्र अहवाल प्राधिकरणास सादर करावा, तसेच सदरील महाविद्यालये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभाग घेणार आहेत किंवा कसे याबाबत त्यांचा खुलासा महाविद्यालयांनी तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या मार्फत सीईटी कक्षास सादर करावा | याबाबत संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांना दिनांक २१/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले असून त्यांचा अहवाल अप्राप्त आहे, या संदर्भात संचालनालय, तंत्र शिक्षण, मुंबई यांना दि.२८/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |
| ४. | २(४) | तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या अहवालानुसार एम.बी.ए. अभ्यासक्रमातील स्वराज इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट, ता. कराड, जिल्हा - सातारा येथे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये ४६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून महाविद्यालयांनी अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार संबंधीत संचालकांना प्रवेश मान्यतेचा प्रस्ताव सादर न केल्या प्रकरणी कारणे दाखवा नोटीस देण्याबाबत निर्देश देण्यात आले होते. | संबंधीत महाविद्यालयास दिनांक ११/०६/२०२१ रोजी नोटीस देण्यात आली आहे. अद्याप संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचा तपासणी अहवाल अप्राप्त आहे. या संदर्भात संचालनालय, तंत्र शिक्षण, मुंबई दि.२८/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |
| ५. | २(५) | तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या अहवालानुसार ज्या महाविद्यालयामध्ये प्रवेश झालेले नाही अथवा ज्या महाविद्यालयांनी प्रवेश मान्यतेचा प्रस्ताव तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांना अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार विहित कालावधीमध्ये सादर केलेला | याबाबत संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांना दिनांक २१/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले असून त्यांचा अहवाल अप्राप्त आहे. या संदर्भात संचालनालय, तंत्र शिक्षण, मुंबई यांना दि.२८/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय क्रमांक | बैठकीतील विषय सूची व निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| | | नाही, अशा महाविद्यालयांकडून संचालनालयाने खुलासा प्राप्त करुन त्याचा स्वतंत्र अहवाल प्राधिकरणास सादर करावा, तसेच सदरील महाविद्यालये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभाग घेणार आहेत किंवा कसे याबाबत त्यांचा खुलासा महाविद्यालयांनी तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या मार्फत सीईटी कक्षास सादर करावा | |
| ६. | २(६) | तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या अहवालानुसार ज्या महाविद्यालयामध्ये प्रवेश झालेले नाही अथवा ज्या महाविद्यालयांनी प्रवेश मान्यतेचा प्रस्ताव तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांना अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार विहित कालावधीमध्ये सादर केलेला नाही, अशा महाविद्यालयांकडून संचालनालयाने खुलासा प्राप्त करुन त्याचा स्वतंत्र अहवाल प्राधिकरणास सादर करावा, तसेच सदरील महाविद्यालये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभाग घेणार आहेत किंवा कसे याबाबत त्यांचा खुलासा महाविद्यालयांनी तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या मार्फत सीईटी कक्षास सादर करावा | याबाबत संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांना दिनांक २१/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले असून त्यांचा अहवाल अप्राप्त आहे. या संदर्भात संचालनालय, तंत्र शिक्षण, मुंबई यांना दि.२८/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |
| ७. | २(७) | तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या दिनांक १८/०५/२०२१ रोजीच्या अहवालानुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये तंत्र शिक्षण संचालनालयांतर्गत विविध व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांनी प्रवेश रद्द केला असल्याचा तपशील सादर केलेला आहे, परंतू प्रवेश रद्द करण्याबाबत विशिष्ठ शेरा नमूद करण्यात आलेला नाही, या अनुषंगाने प्रस्तूत प्रकरणी तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी संबंधीत विद्यार्थी/महाविद्यालय यांच्याकडून अभिप्राय प्राप्त करुन त्याचा अहवाल प्राधिकरणांस सादर करावा. | याबाबत संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांना दिनांक २१/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले असून त्यांचा अहवाल अप्राप्त आहे. या संदर्भात संचालनालय, तंत्र शिक्षण, मुंबई यांना दि.२८/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |



(अ. मी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय क्रमांक | बैठकीतील विषय सूची व निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| ८. | २(८) | तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या दिनांक १८/०५/२०२१ रोजीच्या अहवालानुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील खाजगी विनाअनुदानित थेट द्वितिय वर्ष अभियांत्रिकी व थेट द्वितिय वर्ष औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या संस्थामध्ये प्रवेशित झालेल्या मात्र सीईटी कक्ष/प्राधिकरण कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या यादीमध्ये एकुण १४ विद्यार्थ्यांची तपशील नसल्याचे प्राधिकरणांस अवगत केला. या अनुषंगाने सदर प्रकरणी संबंधीत विद्यार्थ्यांचा तपशील राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष व तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांना तपासणी करण्याबाबत निर्देश देण्यात आले. | कार्यवाही सुरु आहे. |
| ९. | २(१०) | श्री. नवलमल फिरोदिया विधी महाविद्यालय, पुणे येथील प्रवेशित कु. अदित गंगवाणी यांच्या प्रवेशाबाबत. | आज दिनांक ३१/०१/२०२२ रोजी प्रवेश मान्यता पत्र निर्गमित करण्यात आले आहे. |
| १०. | २ (११) | उपसमितीच्या अहवालानुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रमांस प्रवेशित ज्या प्रवेशांमध्ये त्रुटी नाहीत, अशा प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच ज्या प्रवेशामध्ये त्रुटी आढळुन आलेल्या आहेत, अशा प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता नाकारण्यात आली आहे व तद्नुषंगाने सदरील अपात्र विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी संबंधीत महाविद्यालंयास अधिनियम २०१५ मधील कलम २० अन्वये रु. १ .०० लाख प्रति विद्यार्थी दंड आकारण्यात येत आहे, विहित केलेली दंडाची रक्कम प्राधिकरणास भरणा करण्यास महाविद्यालय असमर्थ ठरल्यास तसेच अधिनियम २०१५ मधील कलम क्रमांक २०(५) नुसार वारंवार उल्लंघन किंवा अनियमितता झाल्यास, संबंधीत प्राधिकरणाकडे, अशा संस्थेच्या नावाची संलग्नता किंवा मान्यता काढून घेण्यासाठी शिफारस करण्यात येईल, असा निर्णय प्राधिकरणाने घेतला. प्रस्तूत प्रकरणी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी तात्काळ कार्यवाही करावी. | याबाबत संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांना दिनांक २१/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले असून १७५६ विद्यार्थ्यांच्या बाबतीत अहवाल अप्राप्त आहे.<br>संचालक, तंत्रशिक्षण यांना उक्त अहवाल पाठविण्यासाठी दि.२८/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय क्रमांक | बैठकीतील विषय सूची व निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| | | तसेच उपसमितीच्या अहवालनुसार एकुण १७५६ विद्यार्थ्यांची माहिती उपलब्ध नसल्याचे नमूद करण्यात आलेले आहे, या संदर्भात संचालनालय, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी संबंधीत विद्यार्थ्यांचा सविस्तर तपशील प्राधिकरणास त्वरीत सादर करावा. | |
| ११. | २ (१५) | राज्य सीईटी कक्षाकडून शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या ऑनलाईन सामाईक केंद्रीभूत प्रवेश परिक्षा (CAP) ऑनलाईन पध्दतीने राबविण्यासाठी सेवापुरवठादार यांची नियुक्ती करण्याकरिता सेवापुरवठादार यांची नियुक्ती करण्याकरिता ई-निविदा दिनांक २३/०६/२०२१ रोजी महाटेंडरवर प्रसिध्द करण्यात आली असून निविदा सादर करण्याची अंतिम तारीख दिनांक २९/०७/२०२१ होती. निविदा नुसार सेवापुरवठादार निश्चित करण्याची दिनांक २१/१०/२०२१ रोजी अंतिम प्रक्रिया पुर्ण झाली असून न्यनतम दर असलेले चार निविदाकार अनुक्रमे १) मे. सिंथेसिस सोल्युशन, पुणे, २) मे. एस.एम.बी., मुंबई, ३) मे. तलिस्मा, बैंगलुरु व ४) मे. फोरपिलर्स प्रा.लि., पुणे या निविदाधारकांना मंजूरी देण्यात आली. त्या अनुषंगाने संबंधीत सेवापुरवठादारांसोबत अभ्यासक्रम निहाय कार्यालयीन आदेश व सामंज्यस करार करण्यात आला.<br>Copies of MOU and Admission Rules, brochure should be circulated to all members and members are requested to offer their comments in a month. | राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत दिनांक ४/०२/२०२२ पर्यंत मा. सदस्य, प्रवेश नियमाक प्राधिकरण यांना MoU व प्रवेश नियमावली सादर करण्यात येईल, असे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत अवगत केले. सदर नियमावली प्राधिकरणाच्या सर्व सदस्यांना MOU व प्रवेश नियमावली परिभ्रमित करुन त्यावर त्यांचे अभिप्राय घेण्यात यावे. तसे प्राधिकरणाच्या आगामी बैठकीमध्ये सादर करावे. |
| १२. | २(१६) | माहिती जनसंपर्क संचालनालय कार्यालयाकडून खालील प्रमाणे दोन सेवा पुरावठादार नियुक्त करण्यात आले आहेत.<br>१. मे.कन्सेप्ट कम्युनिकेशन्स लि .,मुंबई - TVC तयार करणे<br>२. मे.कम्युनिकेशन् स्पॅन .,मुंबई - समाज माध्यमातून प्रसार व प्रसिद्धी करणे.<br>प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत याबाबत आतापर्यंत केलेल्या कामाचा अहवाल सादर करावा तसेच पुढील प्रस्तावित कार्यवाहीबाबत अहवाल द्यावा. | त्यानुसार माहिती व जनसंपर्क महासंचालनालय या कार्यालयाने मे. स्पॅन कम्युनिकेशन, यांचे कन्सेप्ट कम्युनिकेशन्स लि. देयक या कार्यालसयास सादर केले आहे व त्यावर पुढील कार्यवाही सुरु आहे.<br>तसेच मे. स्पॅन कम्युनिकेशन , यांनी सोशन मिडीय मोहिम दि.१२/११/२०२१ पासून सुरु करण्यात आली व दि.१२/०१/२०२२ रोजी यशस्वीरित्या वितरीत करण्यात आलेले आहे. मे.स्पॅन कम्युनिकेशन, मुंबई यांनी सादर केलेल्या वर नमूद सोशल मिडीया मोहीमची आवश्यक पडताळणी करुन काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र देण्याची विनंती केलेली असून त्यावर पुढील कार्यवाही |



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य
८/२/२२

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>विषय क्रमांक</th><th>बैठकीतील विषय सूची व निर्देश</th><th>करण्यात आलेली कार्यवाही</th></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td>सुरु आहे.आज दिनांक ३१/०१/२०२२ रोजी संबंधीत प्रकरणी सादरीकरण करण्यात आले. प्राधिकरणाने त्यांची नोंद घेतली.</td></tr>
<tr><td>१३.</td><td>२(१७)</td><td>प्रस्तूत प्रकरणी संबंधीतांनी तयार केलेला खुलासा मा. आयुक्त, सीईटी कक्ष यांनी वस्तूस्थिती तपासून अहवाल प्रनिप्राच्या निर्णयाकरिता दिनांक ३०/१२/२०२१ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात येत असून त्याबाबत निर्णय विषय क्र.४ मध्ये घेण्यात आलेला आहे. मे.सिन्थेसिस प्रा.लि. यांना देयक अदा करण्यात आले आहे.</td><td>मे.सिन्थेसिस प्रा.लि. यांना रु. ५०,४१,५४९ /- एवढया रकमेचे देयक दिनांक २७/०९/२०२१ रोजी अदा करण्यात आले आहे.</td></tr>
<tr><td>१४.</td><td>(३)</td><td>शैक्षणिक वर्ष २०२१ मधील विविध २२- व्यावसायिकपदवीपदव्युत्तरअभ्या/सक्रमांच्या प्रवेश प्रक्रिये दरम्यान उद्भवलेल्या तक्रारींवर सीईटी कक्षातील संबंधीत विभागांनी केलेल्या कार्यावाहीची नोंद घेण्यात आलीतसेच प्रवेश प्रक्रिये दरम्यान . ) सुविधा केंद्राच्याIFC) चुकींमुळे तक्रारी उद्भवल्या असल्यास संबंधीत संबंधीत सुविधा केंद्रावर नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांना निद्रेश देण्यात आले.</td><td>प्राधिकरणाच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे.<br><br><u>या संदर्भात सविस्तर अहवाल सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.</u></td></tr>
<tr><td>१५.</td><td>४(१)</td><td>प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई या दोन्ही कार्यालयांच्या सद्यस्थितीतील जागा खरेदी करण्याबाबतचा प्रस्ताव.</td><td>प्रवेश नियामक प्राधिकरणाण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या दिनांक १४/०१/२०२२ रोजीच्या कार्यालयीन आदेशाद्वारे जागा खरेदीची उर्वरित रक्कम रु. २२,७५,००,०००/- M/s. MSFC, Mumbai यांना दोन्ही विभांगामार्फत अदा करण्यात आलेली आहे</td></tr>
<tr><td>१६.</td><td>४<br>(२)</td><td>प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष कक्षातील कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्तेबाबत भोसले समितीचा अहवालावर खालील निर्देश देण्यात आले.<br>Bhosale Committee Report (Part-II) is accepted except recommendation No. (8).This Report will be implemented from 1.1.2022.So far concerned, for framing Recruitment Rules, etc. the Sub-Committee of ARA is constituted as follows :<br><table><tr><td>1.</td><td>Dr.Vishwajeet Mane, IAS, Director General and Member Secretary, Maharashtra Council of Agriculture Education and Research, Pune</td><td>Chairperson</td></tr><tr><td>2.</td><td>Dr.Dhanraj Mane,</td><td>Member</td></tr></table></td><td>प्राधिकरणाच्या निर्देशानुसार कार्यवाही माहे मार्च २०२२ पर्यंत पूर्ण करण्यात येईल.<br><br><u>या संदर्भात भोसले समितीने अहवालातील नमूद केलेल्या शिफारशीनुसार सविस्तर अहवाल त्वरित सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.</u></td></tr>
</table>



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>विषय क्रमांक</th><th>बैठकीतील विषय सूची व निर्देश</th><th>करण्यात आलेली कार्यवाही</th></tr>
<tr><td></td><td></td><td>
<table>
<tr><td></td><td>Director,Directorate of Higher Education, Pune</td><td></td></tr>
<tr><td>3.</td><td>Dr.K.D. Chavan Registrar,Maharashtra University of Health Sciences, Nashik</td><td>Member</td></tr>
<tr><td>4.</td><td>Secretary, Admissions Regulating Authority and Commissioner, State Common Entrance Test Cell, M.S.</td><td>Convenor</td></tr>
</table>
This Sub-Committee should study the model Recruitment Rules framed by Secretary,GAD and also the Recruitment Rules of other similar Authorities in the country and then submit their Report as early as possible. Till that, action should be taken as per Bhosale Committee Report.</td><td></td></tr>
<tr><td>१७.</td><td>४(३)</td><td>शैक्षणिक वर्ष २०२१-२२ राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत घेण्यात येणाऱ्या विविध व्यावसयिक FNS / CIWGC / PIC / OCI / NRI खिडकी योजना उपलब्ध करून देण्यासाठी नियमावलीमध्ये सुधारणा व मान्यता घेण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. सदर प्रकरणी प्राधिकरणाने खालील निर्देश दिले.<br><br>After through deliberations on this subject, the Admissions Regulating Authority has approved the proposal of of M/s. Edulab Educational Exchange Pvt.Ltd.Mumbai and recommends that this proposal should be submitted to Govt. through DTE. The DTE should recommend to Govt. necessary changes in Admission Rules contained in Admission Brochure for the year 2022-23 regarding fees, procedures, etc. Procedures adopted by Mumbai and Pune Universities may be recommended by DTE while recommending this proposal to Govt.</td><td>सदरील प्रकरणी प्रस्ताव पुढील ०४ दिवसांत संबंधीत संचालनालयामार्फत शासनास पाठविण्यात येईल, असे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत सांगण्यात आले. प्राधिकरणाने ०४ दिवसांत सदरचा प्रस्ताव शासनास पाठविण्याचे निर्देश दिले.</td></tr>
<tr><td>१८.</td><td>४(४)</td><td>शैक्षणिक वर्ष २०२०-२१ च्या तंत्रशिक्षण व उच्च शिक्षण विभागाच्या विविध अभ्यासक्रमांच्या एमएचटी-सीईटी परिक्षेकरिता महा-ऑनलाईन व मे. आय.बी.पी.एस. या सेवा पुरवठादारांसोबत सामंजस्य करार माहे फेब्रुवारी २०२० मध्ये करण्यात आला होता. सदर सेवा पुरवठादारांनी परीक्षे संबंधीत सादर केलेल्या देयकांमध्ये कोव्हिड १९ च्या अनुषंगाने आकारलेल्या SD५० (Social Distancing) एकूण मागणी केलेली देयके खालील</td><td>SD५०चे देयके खालील प्रमणे अदा करण्यात आले आहे.<br>१)या कार्यालयाचे का.आ क्र.रासाप्रपक/ मे.महा ऑनलाईन/SD५०/देयक/२१२/२०२२ दि.२८/०१/२०२२ अन्वये मे. महा ऑनलाईन यांना (रु.१२,०५,७७,४०१/-) अदा करण्यात आले.<br><br>२) या कार्यालयाचे का.आ क्रमांक रासाप्रपक / मे. आय.बी.पी.एस / SD५० / देयक / २१० / २०२२ दि.२८/०१/२०२२ अन्वये मे. आय.बी.पी.एस यांना</td></tr>
</table>



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय क्रमांक | बैठकीतील विषय सूची व निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| | | प्रमाणे आहेत.<br>१) महा ऑनलाईन यांचे एकूण देयक रक्कम रु.१२,०५,७७,४०१.००/- आणि<br>२) मे. आय.बी.पी.एस. एकुण रुक्कम रु.३,३२,३९,०६२.००/अदायगीबाबत प्राधिकरणाने देयक अदा करण्याबाबत निर्देश दिले. | (रु.३,३२,३९,०६२/-) अदा करण्यात आले. |
| १९. | ४(५) | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ च्या प्रवेश प्रक्रियेसाठी उच्च शिक्षण विधी ५ व विधी ३ वर्ष व कृषी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी मे. महा-आयटी यांना काम देण्यात आले असून याबाबत सामंजस्य करार केलेला दिसून येत नाही. सदर प्रवेश प्रक्रिया सुरु झाल्यानंतर अनेक अडचणी आल्यामुळे मे. महा-आयटी यांना देण्यात आलेले कृषी विभागाची प्रवेश प्रक्रिया में. कल्प टेक्नोलॉजी यांनी पूर्ण केली असून विधी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया मे. तलिस्मा यांनी पूर्ण केली आहे, याबाबत मे. महा-आयटी यांनी सादर केलेल्या रु.१,५४,६५,६७०/- मधून मे. तलीस्मा कॉर्पोरेशन या सेवापुरवठादार यांनी सादर केलेल्या देयकांची एकूण रक्कम रु.२२,११,०८९/- ची वजाती करुन उर्वरित रक्कम रु.१,१६,८१,८०१/- मे. महा-आयटी यांनी अदायगीबाबत, तसेच कृषी अभ्यासक्रमासाठी मे.कल्प टेक्नॉलॉजी प्रा.लि.या सेवापुरवठादार यांनी सादर केलेल्या देयकांची एकूण रु. ४५,२२,३०९/- वजाती करून उर्वरित रक्कम रु.२७,२६,४०४/- मे.महा-आयटी यांना अदायगीबाबत प्राधिकरणाने मान्यता दिली आहे. | सदर प्रकरणी उच्च शिक्षण विभागाचे का.आ क्र.उशिप्र/१००टक्के/२०२२/२१४/दि.२८/०१/२०२२नुसार देयक रु.१,१६,८१,८०१/- अदा करण्यात आले आहे.<br><br>कृषी शिक्षण विभागाचे का.आ क्र.उशिप्र/१००टक्के/२०२२/२१४ दि.२८/०१/२०२२नुसार देयक रु.२७,२६,४०४/- अदा करण्यात आले आहे. |
| २०. | ४(७) | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये एमएचटी-सीईटी व इतर सीईटी परीक्षांच्या मे.सिन्थेसिस प्रा.लि.पुणे, यांच्या सहाय्याने विनामुल्य नोंदणी करिता प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि.२८/०५/२०२१ रोजीच्या बैठकीत अभिनंदनाचा ठराव घेण्यात आला होता. सदर बैठकीतील निर्णय बाब क्र. ४ (अ) मध्ये नमूद केल्यानुसार अभिनंदन ठराव मागे घेण्यात आला. मे. सिन्थेसिस प्रा.लि.पुणे यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर राज्य सामाईक प्रवेश परीक्षाकडून प्रस्तावित केल्यानुसार रु.२४/- प्रति विद्यार्थी या दराने प्राधिकरणाने मान्यता दिली व देय | एकुण ८,५६,६५३एवढया विद्यार्थी संख्येस प्रति विद्यार्थी रु. २४/- प्रमाणे रु. २,०५,५९,६७२/- एवढी रक्कम दिनांक १७/०१/२०२२ रोजी राज्य सामाईक प्रवेश परीक्षाकडून अदा करण्यात आलेली आहे. |



(अ. मा. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय क्रमांक | बैठकीतील विषय सूची व निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| | | अदा करण्याचे निर्देश दिले. | |
| २१. | ४(८) (अ) | शैक्षणिक वर्ष २०२१च्या सर्व त्यानुसार २२- अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा ई-निविदा मार्फतनियुक्त करण्यात आलेल्या मे. एड्यूसपार्क या पुरवठादारांमार्फत करण्यात आली . परिक्षेचेवेळापत्रक पुढे ढकल्यामुळे परीक्षेसाठी राखीव केलेल्या परिक्षा केंद्राचे १४ दिवस कालावधीचे अतिरिक्त शुल्क रु. ९,८२,९२,२२०/ - इतके देयक सादर केले. या अतिरिक्त खर्चास तपासणी करुन अदा करण्याचे निर्देश दिले. | प्राधिकरणाच्या निर्देशानुसार कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.<br>***या संदर्भात सविस्तर अहवाल सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.*** |
| २२. | ४(८) (ब) | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षेसाठी सेवा पुरवठादार यांची नियुक्ती करण्याबाबत, सद्यस्थितीतील कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील सर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेश परिक्षा घेण्यासाठी तातडीची निकड लक्षात घेता मे एडयूस्पार्क या पुरवठादाराची मागीलदरामध्ये १५% वाढ करुन मान्यता देण्यात येत आहे.<br>तसेच सीईटी कक्षामार्फत ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी रु. ३०/- प्रति उमेदवार नोंदणी दर प्राधिकरणाने मान्य केले आहेत. | या बाबत राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील विधी विभागामार्फत मे. एड्यूसपार्क यांचे सोबत MOU करण्याची प्रक्रिया सुरु आहे असे अवगत केले.<br><br>या संदर्भात सविस्तर अहवाल प्राधिकरणाच्या आगामी बैठकीपूर्वी सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले. |
| २३. | ४(९) | दिनांक ३०/०८/२०२१ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या बैठकीतील मुद्दा क्र. २ (ड) नुसार मे.फोर पिलर्स इंडिया प्रा.लि.पुणे व मे. कल्प टेक्नोलॉजीस प्रा.लि. पुणे या दोन्ही सेवापुरवठादारांच्या राखून ठेवलेल्या २० टक्के रक्कम अदा करण्यात यावी. सार पोर्टलबाबत मे. कल्प टेक्नोलॉजी प्रा.लि.पुणे यांनी सादर केलेल्या देयकामधून ५ टक्के रक्कम दंड म्हणून वसूल करण्यात यावा. | सार पोर्टलबाबत मे.लि.कल्प टेक्नोलॉजी प्रा ., पुणे यांनी आज दि.२८/०१/२०२१ रोजी देयक या कार्यालयास सादर केले आहे.<br><br>देयक तपासून मान्यतेस सादर करावे. |
| २४. | ४(१३) | संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे यांनी सादर केलेल्या अहवालास अनुसरुन ज्या महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी त्रुटी नाहीत, अशा महाविद्यालयातील (प्रपत्र- अ नुसार) प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तथापि, संचालनालयाचा अहवाल दिरंगाईने सादर | संबंधीतांना प्राधिकरणाच्या दिनांक २१/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. तसेच, सदरची पत्रे स्पीड पोस्टद्वारे पाठविण्याचे निर्देश देण्यात आले. |



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय क्रमांक | बैठकीतील विषय सूची व निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| | | केल्याप्रकरणी संबंधीत महाविद्यालयांना रु. १ लाख दंड आकारण्याचा प्राधिकरणाने निर्णय घेतला आहे. तसेच सदरील महाविद्यालयांच्या प्रवेश मान्यतेची पत्रे निर्गमित करण्याबाबत कार्यवाही त्वरीत करावी. | |
| २५. | ४ (१४) | शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील श्री. मनोरमाबाई मुंडले कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, नागपुर येथील वास्तुशास्त्र अभ्यासक्रमास प्रवेशित कु. वैष्णवी अनंत बर्डे यांच्या प्रवेश प्रकरणी प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. २(ग) मधील निदे्रशानुसार प्रस्तूत प्रकरणी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी तपासणी करुन अंतिम अहवाल प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये सादर करण्याचे निर्देश आहेत, त्यानुसार अहवाल प्राधिकरणाच्या उचित कार्यवाहीकरिता सादर. | महाविद्यालय व संबंधीत विद्यार्थी/विद्यापीठ यांना दि.२८/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |
| २६. | ४ (१५) | शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील अंजूमन कॉलेज ऑफ इंजिनियरींग ॲण्ड टेक्नोलॉजी, नागपूर या महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थी कु. अनास सैद खान याचा प्रवेश खुल्या प्रवर्गात करण्याबबात मा. उच्च न्यायालयाच्या याचिका क्रमांक २४८६/२०२१ मधील न्यायालयीन आदेशास अनुसरुन प्राधिकरणाच्या निर्णयाकरिता सादर. | महाविद्यालय व संबंधीत विद्यार्थी/विद्यापीठ यांना दि.२८/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |
| २७. | ४ (१७) | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये कर्मवीर भाऊराव पाटील ईन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च, सातारा या महाविद्यालयातील एमबीए या अभ्यासक्रमास प्रवेशित कु. अहमद इर्शाद कुरेशी या खुल्या प्रवर्गातील प्रवेश प्रकरणी मा. उच्च न्यायालय येथे याचिका क्रमांक ८४४६/२०२१ दाखल केलेली असून, प्रस्तूत प्रकरणी मा. न्यायालयाच्या दिनांक ८/१२/२०२१ रोजीच्या न्यायालयीन आदेशास अनुसरुन प्राधिकरणाच्या निर्णयाकरिता सादर. | महाविद्यालय व संबंधीत विद्यार्थी/विद्यापीठ यांना दि.२८/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. |
| २८. | ४ (१८) | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचा प्रवेश पडताळणी अहवाल प्राधिकरणाच्या झालेल्या बैठकीमध्ये सादर न झाल्यामुळे ज्या महाविद्यालयांच्या प्रवेशास प्राधिकरणाची अद्याप | प्राधिकरणाच्या निर्णयानुसार संबंधीत २६ महाविद्यालयांना मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या मान्यतेनुसार दिनांक १०/०१/२०२२ व १८/०१/२०२२ रोजीची प्रवेश मान्यता पत्रे ईमेलद्वारे अवगत करण्यात आली. |



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>विषय क्रमांक</th><th>बैठकीतील विषय सूची व निर्देश</th><th>करण्यात आलेली कार्यवाही</th></tr>
<tr><td></td><td></td><td>मान्यता प्रदान झालेली नाही. अशा २६ महाविद्यालयांनी संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचा प्रवेश पडताळणी अहवाल प्राधिकरणास सादर केलेला आहे. तसेच प्रस्तूत प्रकरणी संबंधीत महाविद्यालयांनी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता मिळण्याची विनंती केलेली आहे. या अनुषंगाने प्राधिकरणाच्या मान्यतेकरिता सादर.</td><td><u>शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्राधिकरणाच्या प्रवेश मान्यतेची पत्रे स्पीड-पोस्टाद्वारे सात दिवसात पाठविण्याचे निर्देश दिले.</u></td></tr>
<tr><td>२९.</td><td>४(२०)</td><td>प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २९/०७/२०२१ (परिशिष्ठ-अ) व व २९/०७/२०२१ (परिशिष्ठ-ब) मधील निद्रेशास अनुसरुन महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी दिनांक १८/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या अहवालास अनुसरुन ज्या महाविद्यालयांच्या प्रवेश प्रकरणी त्रुटी नाहीत, अशा महाविद्यालयांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.</td><td>सदरील प्रकरणी संबंधीतांना पुढील ०४ दिवसांत कळविण्याचे निर्देश देण्यात आले.</td></tr>
<tr><td>३०.</td><td>४(२१)</td><td>After perusal of this list of 377 Review Applications as per Annexure C, only in case of complete Review Applications hearing should be given to them Universitywise as far as possible by Chairman,ARA at their head Quarteres. The Chairman,ARA, should take decisions as was decided on this subject by ARA on 10.6.2021.<br>In respect of incomplete Review Applications concerned, opportunity should be given to them for rectifying their mistake within 7 days and if they fail to rectify the lacunae in the Review Application alongwith with the 7 enclosures, these Review Petitions should be rejected. Accordingly, the Chairman, ARA, should take decision application-wise. Similar such procedures should be followed while deciding on Review Application in future.</td><td>मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी खालील प्रमाणे विद्यापीठ निहाय सुनावणी प्रक्रिया पुर्ण केलेली आहे,-
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>विद्यापीठाचे नाव</th><th>दिनांक</th><th>एकुण पुनर्विलोकन यांचिकांची संख्या</th></tr>
<tr><td>१)</td><td>महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक</td><td>१२/१/२०२२ ते १४/१/२०२२</td><td>९३</td></tr>
<tr><td>२)</td><td>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद</td><td>१८/१/२०२२ ते १९/१/२०२२</td><td>१२</td></tr>
<tr><td>३)</td><td>डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड</td><td>२४/१/२०२२ ते २५/१/२०२२</td><td>२३</td></tr>
</table></td></tr>
</table>



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय क्रमांक | बैठकीतील विषय सूची व निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| | | | उर्वरित पुनर्विलोकन याचिका संदर्भात विद्यापीठ निहाय सुनावणी कार्यक्रम यथावकाश आयोजित करण्यात येत आहे.<br><br>तसेच या संदर्भात ३७७ व्यतिरिक्त नव्याने प्राप्त झालेल्या पुनर्विलोकन यांचिकांचा तपशील सोबत जोडला आहे. (प्रपत्र- अ)<br><br>सुनावणी दरम्यान संबंधीत सर्व महाविद्यालयांना पुनर्विलोकन याचिका अर्जामध्ये नमूद केलेल्या बाबी ०७ दिवसांत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. |
| [illegible]. | ४(२२) | प्रस्तूत प्रकरणी आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी तपासणी करुन प्रलंबित असलेली देयक तथा केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्याबाबत प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. | तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांना रु. १,४७,७०,९३२/- एवढी रक्कम शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील प्रवेश प्रकरणी मानधन अदा करण्यात आलेले आहे. |

**विषय क्रमांक ३: शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या तक्रारीं.**

या बाबत अहवाल निरंक असल्याची, नोंद घेण्यात आली.

**विषय क्रमांक ४: शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदव्युत्तर पदवी दंत अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यता प्रस्तावांबाबत.**

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील वैद्यकीय शिक्षण विभागाअंतर्गत व्यावसायिक पदव्युत्तर दंत अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार अहवाल प्राधिकरणास सादर केलेले आहेत. सदरील अहवालाचे संकलन करुन प्राधिकरण कार्यालयाने गोषवारा प्राधिकरणाच्या मान्यतेकरिता सादर केला आहे.

सदरील अहवालानुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक पदव्युत्तर दंत अभ्यासक्रमास प्रवेशित अनिवसी भारतीय कोटा व अनिवासी भारतीय कोटयांतर्गत् रिक्त असलेल्या जागांवर झालेल्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या आवश्यक कागदपत्रांची तपासणी अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार करण्याकरिता खालील प्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे. सदरील समितीने त्यांचा परिपूर्ण अहवाल १ महिन्यात प्राधिकरणास सादर करावा, समितीचा तपशील खालील प्रमाणे,-



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

१)	डॉ. के.डी. चव्हाण,
	कुलसचिव,
	महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तथा
	सदस्य, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.

२)	श्री. सिध्देश नर,
	परिक्षा समन्सयक,
	वैद्यकीय/आयुष विभाग,
	राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई.

तसेच संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अहवालानुसार ज्या प्रवेशामध्ये त्रुटी नाहीत, अशा प्रवेशांना प्राधिकरणाच्या अटी/शर्तींच्या अधीन राहून प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे (प्रपत्र-ब). संबधीत महाविद्यालयांना प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क अदा करणे अनिवार्य राहील.

विषय क्रमांक ५: शासनाची 'कार्यालयीन कार्यपध्दती नियम पुस्तिका' प्रवेश नियामक प्राधिकरण आणि राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या कार्यालयात लागू करणेबाबत.

शासनाची "कार्यालयीन कार्यपध्दती नियम पुस्तिका" याचे अवलोकन करण्यात आले, तसेच सदरील पुस्तिकेमध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दती प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोन्ही विभागांमध्ये दिनांक १/०२/२०२२ रोजी पासून लागू करण्यात येत आहे याबाबत तंतोतंत अमंलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच उक्त नमूद कार्यपध्दतीमधील लागु नसणाऱ्या (प्रपत्र-क) बाबी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी तपासून मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांना पुढील १ महिन्याच्या आत सादर करावे. याबाबत मा.अध्यक्षांचा निर्णय अंतिम राहिल.

विषय क्रमांक ६ : मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.

अ) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क निश्चितीबाबत.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ अस्तित्वात आल्यापासून अधिनिमय २०१५ मधील तरतूदींस अनुसरुन प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाच्या प्रक्रिया शुल्क निश्चितीबाबत तत्कालीन मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेमध्ये उपसमिती गठित करण्यात आली होती व सदरील उपसमितीने सादर केलेल्या अहवालास अनुसरुन तत्कालीन प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २३/११/२०१६ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ८ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१५-१६ व २०१६-१७ मधील प्राधिकरणाचे "प्रक्रिया शुल्क" निश्चित करण्यात आले होते व सदरील सुत्रानुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पर्यंत अशा ०५ वर्षाच्या कालावधीकरिता महाविद्यालयांकडून प्रक्रिया शुल्क आकारण्यात आलेले आहे. आता सदर प्रक्रिया शुल्काच्या परिगणनेत बदल करणे आवश्यक असल्याने,

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क निश्चितीबाबत खालील प्रमाणे सुत्र निश्चित करण्यात येत आहे,-

| CAP Quota (Total Seats) | Over and above actual admissions of TFWS / EWS / PMSSS / J&K, etc. | Total (1+2) | Rs. 100 x No. of admissions shown in column No. (3), but not less than Rs. 20,000/- | No. Institutionl / Management Quota (Total Seats) x Rs. 2000/- | No. of Actual NRI admissions x Rs. 3000/- | Total Processing Fees (Column No. 4+5+6=7) |
|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) |
| -- | -- | -- | -- | -- | -- | -- |

वरील सुत्रानुसार प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क आकारणीबाबत सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी उचित कार्यवाही त्वरीत करावी.

**ब) <u>शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील आयुष शिक्षण विभागाअंतर्गत ०५ महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत.</u>**

आयुष शिक्षण विभागातंर्गत अभ्यासक्रमांस प्रवेशित त्रुटी दर्शविण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशांबाबत दिनांक १२/११/२०२० व दिनांक १३/११/२०२० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सदरील सुनावणीस अनुसरुन संचालक, आयुष संचालनालय, मुंबई यांनी प्रवेश पडताळणी अहवाल प्राधिकरणास सादर केला. मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या दिनांक २१/१०/२०२१ रोजीचे सुनावणी आदेश/निर्णय संबंधितांना कळविण्यात आले. सदरील सुनावणी आदेश/ निर्णयांच्याबाबत संबंधित ०५ महाविद्यालयांनी प्राधिकरणाकडे पुर्नविलोकन अर्जाद्वारे प्रवेश नियमित करण्याची विनंती केली आहे. सदरचे प्रवेश हे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील असून संबंधित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता, संचालक, आयुष संचालनालय, मुंबई यांच्या तपासणी अहवालानुसार पात्र असलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश नियमित करण्याची विनंती केली आहे. सदर विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची पुर्तता महाविद्यालयांनी विहित कालावधीमध्ये केली नसल्याने सदरच्या प्रवेशांना तत्कालीन प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली नाही.

वरील बाबी विचारात घेता मा. सर्वोच्च न्यायालय / उच्च न्यायालय यांचे विशेषत: जात प्रमाणपत्र/ जात वैधता प्रमाणपत्र याबाबत अवमान होणार नाही, याची खात्री करुन, सदरील प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच संबंधीत महाविद्यालयांनी केलेल्या बेजबाबदारपणा / निष्काळजीपणा व अशी चूक भविष्यात महाविद्यालयांनी करु नये याकरिता दंड आकारण्याचा प्राधिकरणाने निर्णय घेतला आहे. सविस्तर तपशील सोबत जोडला आहे. <u>(प्रपत्र- ड)</u>.

(क) The important financial/ establishment matters should be brought to the notice of Admissions Regulating Authority, M.S. for approval through Hon' Chairman before taking decisions by the Secretary, Admissions Regulating Authority, M.S. and Commissioner, State Common Entrance Test Cell.

४/२/२२

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

(ड) It is observed that there is inordinate delay in implementations of directions/ decisions of the Admissions Regulating Authority, M.S. in the past. The Secretary, Admissions Regulating Authority, M.S. and Commissioner, State Common Entrance Test Cell should ensure correct, complete and quick implementation of Admissions Regulating Authority, M.S. decision/direction henceforth.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, बैठकीच्या सरतेशेवटी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक :